# रशिया युक्रेन युध्दाची वाटचाल

**डॉ. अनंत आ. रिंढे**

यशवंत महाविद्यालय, सेलू, जि. वर्धा

इतिहास विभाग प्रमुख

Email - anantrindhe15@gmail.com

**सारांश (Abstract) :**

रशियात इ. स. 1917 मध्ये राज्यक्रांती झाल्यामुळे तेथील राजेशाही संपुष्टात येऊन 1922 मध्ये तेथे साम्यवादी विचारसरणीच्या सोव्हिएत युनियनचा उदय झाल्याचे दिसते. त्यावेळी युक्रेन हा सोव्हिएत संघराज्याच्या संस्थापक सदस्यांपैकी एक होता. जवळपास 69 वर्ष युक्रेन आणि रशिया हे दोन देश सोव्हिएत संघराज्याचा भाग म्हणून एकत्र राहिलेले दिसतात. द्वितीय जागतिक महायुध्दात युक्रेनचे सैनिक रशियाच्या सैनिकांच्या सोबत एकनिष्ठेने लढल्याचे आपणास दिसून येते. दुसऱ्या जागतिक महायुध्दानंतर अमेरिका व रशिया या दोन देशांचा जागतिक महासत्ता म्हणून उदय झाला. अमेरिकेला संपूर्ण जगात आपल्या नेतृत्वाखाली लोकशाहीप्रधान भांडवलशाही राजवटी प्रस्थापीत करायच्या होत्या. तर रशियाला साम्यवादी राजवटी निर्माण करायच्या होत्या यातूनच या दोन देशात शितयुध्द सुरु झाले. या शितयुध्दाच्या काळात अमेरिका व रशियाच्या नेतत्वाखाली जगात दोन गट निर्माण झाले. शितयुध्दाच्या काळात युक्रेन सोव्हिएत संघराज्याचा भाग असल्यामुळे अमेरिकेच्या विरोधात होता. कालांतराने सोव्हिएत देशामधील गरिबी, शीतयुध्दाचे दुष्परिणाम, सोव्हिएत राष्ट्राध्यक्ष मिखाईल गोर्बाचेव्ह यांनी आणलेले बदल या बाबींमुळे इ. स. 1991 मध्ये सोव्हिएत युनियनचे विघटन झाले त्यावेळी सोव्हिएत युनियनमधून 15 देश बाहेर पडले तेव्हाच युक्रेन सुध्दा बाहेर पडला होता. या गोष्टीची सल रशियाचे विद्यमान राष्ट्राध्यक्ष व्लादीमीर पुतीन यांच्या 30 वर्षानंतरही कायम असल्याचे दिसते. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये सोव्हिएत संघराज्यातून युक्रेन बाहेर पडल्यानंतर सुरुवातीच्या काळात रशिया- युक्रेन संबंध कसे होते? इ. स. 1994 च्या बुडापेस्ट करारात रशिया व युक्रेनमध्ये काय ठरले? रशिया व युक्रेन यांच्यात वाद निर्माण होण्याचा कळीचा मुद्दा कोणता होता? याचे विश्लेषण करण्यात आले आहे.

**बिजसंज्ञा (Key Words) :**

शितयुध्दाचा काळ व नाटो करार, सोव्हिएत रशियाचे विघटन, शितयुध्दाची समाप्ती, बुडोपस्ट करार, युक्रेनचा नाटो सदस्यत्वाचा आग्रह, रशिया- युक्रेन युध्द.

**संशोधनाची उद्दिष्टे (Objective of Research Paper) :**

1. रशिया- युक्रेन युध्द का उद्भवले याचे विश्लेषण करणे.

2. रशिया- युक्रेन युध्द टाळता आले असते का? याचा उहापोह करणे.

**प्रस्तावना (Introduction) :**

दुसऱ्या जागतिक महायुध्दानंतर अमेरिका व रशिया या दोन देशांचा जागतिक महासत्ता म्हणून उदय झाला होता. अमेरिका व रशिया या दोन्ही देशांना आमच्याच देशाचे संपूर्ण जगावर वर्चस्व राहायले हवे असे वाटत होते. ह्यातूनच शितयुध्दाचा काळ सुरु झाल्याचे आपणास माहित आहे. ह्या शितयुध्दाच्या काळात रशियाला विरोध करण्यासाठी अमेरिकेच्या पुढाकाराने नाटो ही लष्करी संघटना स्थापन करण्यात आली होती. सोव्हिएत संघराज्याच्या विघटनानंतर युक्रेन हा देश सोव्हिएत रशियामधून बाहेर पडला परंतु युक्रेन हा सामरिकदृष्ट्या कायमच रशियासाठी महत्त्वाचा राहिलेला आहे. शितयुध्दाच्या काळात सोव्हिएत युनियनचा मोठा अण्वस्त्रसाठा हा युक्रेनमध्येच ठेवलेला होता. भौगोलिकदृष्ट्या विचार केल्यास लक्षात येते की, रशियाची राजधानी मास्को आणि युक्रेनची राजधानी किव्ह यामध्ये फक्त 750 ते 800 किलोमिटरचे अंतर आहे. काळा समुद्र आणि भूमध्य सागरातील व्यापारी मार्गाचा विचार करता युक्रेन हा आपल्या बाजुने राहावा, असे रशियाला वाटत होते. युक्रेन हा नाटोचा सदस्य नसूनही युरोपियन देश हे युक्रेन ला अण्वस्त्रे पुरवित आहेत. युक्रेन हा नाटोचा सदस्य होण्यासाठी प्रयत्न करीत आहे, ह्याला रशियाचा विरोध आहे. युक्रेन जर नाटोचा सदस्य बनला तर युरोपियन देशाचे सैन्य थेट युक्रेनच्या सिमेवर येऊ शकते. हे रशियाला आपल्या देशाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने घातक वाटते. रशिया- युक्रेन युध्दाची बिजे ही काही अंशत: शितयुध्दाच्या काळात जो नाटो करार (लष्करी संघटना) अस्तित्वात आला त्यामध्ये दिसून येतात.

**शितयुध्दाचा काळ व नाटो करार :**

सोव्हिएत रशियाच्या संभाव्य विस्तारवादाविरुध्द पश्चिम युरोपीय लोकशाही राष्ट्रांना आर्थिक व लष्करी संरक्षण देण्यासाठी 4 एप्रिल 1949 रोजी अमेरिकेने पश्चिम युरोपीय राष्ट्रांच्या सहकार्याने नाटो करार केला. या कराराच्या स्थापनेवेळी बेल्जीयम, कॅनडा, डेन्मार्क, फ्रान्स, आइसलंड, इटली, लक्झेंबर्ग, नेदरलंड, नॉर्वे, पोर्तुगाल, इंग्लंड, अमेरिका ही 12 राष्ट्रे सदस्य होती. आज नाटो ही जगातील 30 देशांचा सहभाग असलेली एक लष्करी संघटना असून उत्तर मॅसिडोनिया हा देश नाटोचा 30 वा सदस्य असणारा देश आहे. ह्याच नाटो करारामध्ये युक्रेन ला सामील करुन घेण्याची खटपट सुरु केली होती किंबहुना सुरु आहे. हाच रशिया- युक्रेन युध्दाचा कळीचा मुद्दा आहे.

**रशियाचे विघटन :**

सोव्हिएत संघराज्य हे आर्थिक संकटामुळे डबघाईस येऊ लागताच रशियाचे विघटन झाले. त्यातून अनेक देश उदयास आले. रशियाच्या विघटनानंतर डिसेंबर 1991 मध्ये युक्रेन हा स्वतंत्र राष्ट्र म्हणून उदयास आला. भारताने युक्रेनच्या स्वतंत्र सरकारला मान्यता दिली होती. सुरुवातीचे काही दिवस रशिया व युक्रेन यांचे संबंध मधुर होते.

**शितयुध्दाची समाप्ती :**

इ. स. 1991 मध्ये सोव्हिएत रशियाचे विघटन झाल्यानंतर रशियाचा धोका नाहीसा झाल्याची अमेरिकेची खात्री पटली होती. तसेच यापुढे शितयुध्द चालू राहणे योग्य ठरणार नाही हे रशियाने सुध्दा

ओळखले होते. त्यामुळे अमेरिकन राष्ट्राध्यक्ष जॉर्ज बुश आणि रशियन फेडरेशनचा अध्यक्ष बोरिस येल्तासिन यांनी शितयुध्द संपुष्टात आल्याची औपचारिक घोषणा केली होती.

**बुडापेस्ट करार :**

इ. स. 1994 च्या बुडापेस्टच्या करारानुसार युक्रेनने आपली सर्व अण्वस्त्र रशियाच्या स्वाधीन केली होती. त्या मोबदल्यात रशियाने व अमेरिकेने संयुक्तपणे युक्रेनचे सार्वभौमत्व, सुरक्षा आणि सिमा यांचं संरक्षण करण्याची हमी दिली होती.

**नाटोचा सदस्य होण्यासाठी युक्रेन आग्रही :**

सन 2005 मध्ये युश्चनको हे युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष बनले. ते अमेरिका समर्थक होते. त्यांनी नाटो व युरोपीय समुदायात सदस्य होण्याची महत्वाकांक्षा जाहीर करताच रशिया व युक्रेन या दोन देशात वादाची ठिणगी पडली. 21 एप्रिल 2019 रोजी युक्रेनने नाटोचा सदस्य बनण्यासाठी घटनेत बदल केला तो रशियाला सहन होण्यासारखा नव्हता.

मे 2019 मध्ये व्होलोदिमिर झेलन्स्की हे युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष बनल्यानंतर त्यांना रशिया- युक्रेन संबंध सुधारण्याची संधी होती, ती अशी की 'आम्ही युरोपीय समुदायाचं सदस्यत्व केवळ आर्थिक कारणांसाठी घेऊ तसेच नाटो या लष्करी संघटनेच सदस्यत्व आम्ही घेणार नाही' अशी तडजोड जर त्यांनी रशियासमोर मांडली असती तर रशियाचे अध्यक्ष व्हालोदिमिर पुतीन यांनी ती स्वीकारली असती. झेलन्स्की यांना अशा पध्दतीची मुत्सद्देगिरी दाखविणे जमले नाही किंबहुना अमेरिकेने ते होऊ दिले नाही.

वास्तविकत: शितयुध्दाच्या काळात नाटो समुदायाने रशियाला आश्वस्त केले होते की नाटो समुदायाची सीमा जर्मनीपर्यंत मर्यादित राहिल, परंतु प्रत्यक्षात हे आश्वासन पाळल्या गेले नाही. ह्या शितयुध्दाच्या काळात अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष रोनाल्ड रेगन यांनी रशियाचे अध्यक्ष गोर्बाचेव्ह यांना असा विश्वास दिला होता की पोलंडच्या पूर्वेकडे नाटोचा विस्तार होणार नाही परंतु अमेरिकेने तो पाळलेला दिसत नाही. रशियाच्या विघटनानंतर स्वतंत्र झालेल्या काही छोट्या देशांना नाटोचे सदस्यत्व बहाल करण्यात आले. त्यासोबतच युक्रेनला सुध्दा नाटोत सहभागी करुन घेण्याच्या हालचाली सुरु झाल्या होत्या. युक्रेन नाटोत सामील झाला असता तर नाटोचे सैन्य थेट रशियाच्या सीमेपर्यंत आले असते. रशियाच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून रशियाला ते मान्य होणार नव्हते, त्यामुळेच युक्रेनवर आक्रमण करुन तिथे सत्तापालट करुन आपल्या नियंत्रणाखालील कळसुत्री सरकार तिथे स्थापन करण्याशिवाय रशियासमोर पर्याय नव्हता.

**युक्रेन युध्द थांबविण्यासाठी रशियाच्या चार अटी :**

1) पूर्व युक्रेनमधील बंडखोर दन्यत्स्क व लुहान्स्क या प्रांतांना स्वतंत्र देश म्हणून मान्यता द्यावी.
2) युक्रेनने तातडीने लष्करी कारवाई थांबवावी.

3) युक्रेनने नाटोच्या सदस्यत्वाचा प्रयत्न कायमस्वरुपी थांबवावा, देशाला तटस्थ घोषीत करण्यासाठी घटनेत बदल करावा.

4) 2014 मध्ये रशियाने ताब्यात घेतलेला क्रिमीया हा रशियाचा भाग आहे, हे युक्रेन ने मान्य करावे.

वरील अटी झेलेन्स्की यांनी अमान्य केल्या.

**रशिया- युक्रेन युध्द :**

रशिया- युक्रेन संघर्षाला काही प्रमाणात अमेरिका आणि नाटो समुदायाने खतपाणी घातल्याचे दिसते. युक्रेनने नाटोचा सदस्य होण्याचा मानस व्यक्त करताच रशियाने त्यावर आक्षेप घेतला होता.

24 फेब्रुवारी 2022 रोजी ब्लादिमिर पुतीन यांनी घोषणा केली होती की रशियाने पूर्व युक्रेनमध्ये विशेष लष्करी ऑपरेशन सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे. 24 फेब्रुवारी 2022 रोजी रशियाने युक्रेनवर लष्करी कारवाई सुरु केली. पुतीन यांच्या घोषणेनंतर काही अवधीतच कीव, खार्किव, डॉनबास येथे स्फोट झाल्याचे दिसून येते. पहिल्याच दिवशी युक्रेनचे सैनिक व सामान्य नागरिक मिळून 137 लोकांचे प्राण गेले. वास्तविकत: युध्दाने कोणतेही प्रश्न सुटत नाही, उलट नवे प्रश्न निर्माण होतात. युध्दात हरणारा देश तर हरतोच परंतु विजयी देशालाही खुप काही गमवावे लागते. दुरचा विचार केला तर त्याचीही या युध्दात हारच झालेली असते.

हे युध्द सुरु झाल्यानंतर आठ-दहा दिवसात युक्रेन आपल्यासमोर गुडघे टेकेल, अशीच रशियाचे अध्यक्ष पुतीन यांची धारणा होती. परंतु पुतीन यांची धारणा खोटी ठरली. युक्रेनने अतिशय चिवट प्रतिकार केला, अजुनही करीत आहे. वास्तविकत: रशियन लष्कराला इतके दिवस थोपवून धरण्याची युक्रेनची क्षमता नाही. परंतु अमेरिकेने युक्रेनला कधी पडद्याआड तर कधी उघड मदत पुरविल्याचे लपून राहिलेले नाही. या युध्दात युक्रेनची किव्ह सारखी अनेक शहरे उध्वस्त झाली व अजुनही होतील. तसेच लाखो लोक युक्रेनमधून बाहेर पडले आहेत. द्वितीय जागतिक महायुध्दात हिटलरने राजधानी बर्लीन वाचविण्याचा शेवटचा उपाय म्हणून लोकांच्या हातात शस्त्रे दिली होती. त्याचप्रमाणे परिस्थिती हाताबाहेर जाताच युक्रेनमधील झेलन्स्की सरकारने सर्वसामान्य लोकांप्रमाणेच तुरुंगातील गुन्हेगारांच्या हातात शस्त्रे दिल्याचे दिसून येते. आज 18 जुलै 2022 रोजी युक्रेन युध्दाचा 144 वा दिवस आहे. सध्या रशियाने युक्रेनचा पूर्वभाग जवळपास पूर्णपणे ताब्यात घेतला आहे. उर्वरित युक्रेनवर रशियाचे हल्ले सुरु आहेत. लवकरच हे युध्द कोणत्या टोकाला जाऊन पोहचेल हे येणारा काळच ठरवेल.

**निष्कर्ष (Conclusion) :**

रशियाचे अध्यक्ष ब्लादिमिर पुतीन यांनी युक्रेनवर केलेल्या हल्ल्याकडे सध्या सर्व जगाचे लक्ष केंद्रीत झालेले आहे. आज दि. 18 जुलै 2022 रोजी रशिया- युक्रेन युध्दाला 144 दिवस पूर्ण झाले आहेत. खरे तर या युध्दात आपण दोन-तीन दिवसात युक्रेनचा निकाल लाऊ या अर्विभावात रशिया होता परंतु तसे झालेले दिसून येत नाही. रशियाने मागील दोन महिने युक्रेनच्या पूर्व भागावरच लक्ष केंद्रित केल्याचे दिसून येते. हा भाग जवळपास पूर्णपणे रशियाच्या ताब्यात आल्याचे दिसून येते. सध्या रशियाने उर्वरित युक्रेनवर

पुन्हा हल्ले सुरु केल्याचे दिसून येते. रशियाने पहिल्या टप्प्यात केलेल्या हल्ल्यांमध्ये युक्रेनमधील दुसऱ्या क्रमांकाचे शहर असलेल्या खारकिव्हची प्रचंड प्रमाणात हानी केली. सध्या रशियाने युक्रेन विरोधातील हल्ले आणखी तिव्र केले असून युक्रेनच्या अनेक शहरांवर विमानातून बॉंबवर्षाव करण्यात येत आहे. तसेच क्षेपणास्त्रांचाही मारा करण्यात येत आहे. खरे तर या युध्दामध्ये अमेरिकेने युक्रेनला आपला मोहरा बनविल्याचे दिसून येते. युक्रेन हा देश अमेरिकेच्या तालावर नाचत आहे. रशिया- युक्रेन हे युध्द लांबवून रशियाचा शक्तिपात घडवून आणण्याचे अमेरिकेचे हे एक षडयंत्र असल्याचे दिसून येते. हे युध्द सतत चालू ठेऊन 'युध्दखोर रशिया' म्हणून रशियाचा चेहरा संपूर्ण जगासमोर अमेरिकेला आणायचा असल्याचे दिसते. युक्रेन या देशाला अमेरिका व इतर युरोपीय देशांचे सहकार्य आहे याची जाणीव रशियाला सुध्दा आहे. संपूर्ण युक्रेनवर सत्ता हस्तगत करता येणार नाही तसेच या युध्दात रशियाची हानी होत आहे हे सुध्दा रशियाला माहित आहे. परंतु युक्रेनने नाटोचे सदस्यत्व पत्करु नये, युक्रेनने पूर्णत: पाश्चात्य देशाकडे झूकू नये, ते रशिया मान्य करणार नाही असा धडा युक्रेनला शिकवायचा आहे, किंबहुना तसा संदेश युक्रेनला द्यावयाचा आहे, असे या युध्दातून दिसून येते. युरोपीय देशाच्या विरोधात युक्रेनचा बफर झोन (सुरक्षित भाग) म्हणून वापर करण्यासाठी रशियाला युक्रेनवर वर्चस्व हवे आहे. युक्रेनला नाटोचा सदस्य बनवून अमेरिकेला नाटोच्या फौजा युक्रेनच्या सिमेवर आणून रशियाला शह द्यायचा आहे. त्यासाठीच अमेरिका हा युक्रेनला पूर्णत: सहकार्य करीत असल्याचे दिसून येते.

**संदर्भग्रंथ सूची :**


आचार्य, धनंजय. *आधुनिक जग.* नागपूर : श्री साईनाथ प्रकाशन.

आठल्ये, विभा. *आधुनिक जगाचा इतिहास.* नागपूर : सर साहित्य केंद्र.

देशमुख, एस. एल. (2022, मार्च 16). रशियाशी मैत्री कायम राखावी. *दैनिक सकाळ.* पृ. क्र. 5.

वासलेकर, संदीप. (2022, मार्च 6). युक्रेनचं युध्द. *दैनिक सकाळ सप्तरंग, पुरवणी.* पृ. क्र. 1.

साळुंके, विजय. (2022, मार्च 9). फॅसिस्टांना पोसणारा जुगार. *दैनिक सकाळ, पुरवणी.* पृ. क्र. 6.